# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:10.10.2025** **वार:शुक्रवार**

---

1. देशातील डिजिटल परिसंस्था नवोन्मेष आणि सर्वसमावेशनासाठी जागतिक मानके स्थापित करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. प्रधानमंत्री धनधान्य योजना आत्मनिर्भतेसाठी महत्वाचं पाऊल-कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान
3. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना आज
4. गाझा शांतता कराराबद्दल पंतप्रधान मोदी यांची नेतन्याहू आणि ट्रंप यांच्याशी चर्चा आणि
5. भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान दुसरी क्रिकेट कसोटी आजपासून दिल्लीत

**फिनटेक-मंजुषा**

देशातील डिजिटल परिसंस्था नवोन्मेष आणि सर्वसमावेशनासाठी जागतिक मानके स्थापित करत आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत काढले. ग्लोबल फिनटेक महोत्सवात पंतप्रधान मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान किअर स्टार्मर सहभागी झाले होते. यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले....

**डिजिटल टेक्नोलॉजी का भी हमने डेमोक्रेटाइजेशन किया है। इसको देश के हर सिटीजन हर रीजन के लिए एक्सेसिबल बनाया है। आज ये भारत का गुड गवर्नेंस मॉडल बन चुका है। भारत ने दिखाया है कि टेक्नोलॉजी केवल सुविधा नहीं समानता का साधन भी बन सकती है।**

देशात दरमहा UPI द्वारे 20 अब्ज व्यवहारांच्या माध्यमातून 25 लाख कोटी रुपयांची देवाण घेवाण होत आहेत, असं पंतप्रधानांनी सांगितलं. ब्रिटन आणि भारत हे फिनटेकमध्ये भागीदार देश असून मुक्त व्यापार करार दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेला चालना देईल, असा विश्वास ब्रिटनचे पंतप्रधान किअर स्टार्मर यांनी व्यक्त केला.

**मोदी-स्टार्मर**

भारत आणि ब्रिटन दरम्यानची वाढती भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार ठरली आहे. या भागीदारीमुळे दोन्ही देशांत व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी निर्माण झाल्या आहेत, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मुंबईत केलं. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. पंतप्रधान मोदी आणि स्टार्मर यांच्यामध्ये काल झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर मोदी आणि स्टार्मर यांनी संयुक्त निवेदन जारी केलं. स्टार्मर यांच्यासोबत 126 कंपन्यांचे मोठं शिष्टमंडळ भारत भेटीसाठी आलं आहे. हे प्रतिनिधी मंडळ ही भागीदारीतील नव्या ऊर्जेचं द्योतक असल्याचं मोदी म्हणाले. काल झालेल्या चर्चेमध्ये इंडो-पॅसिफिक आणि पश्चिम आशियातील स्थैर्य तसंच युक्रेन आणि गाझामध्ये शांतता प्रस्थापित होण्यावर दोन्ही नेत्यांमध्ये एकमत झालं.

भारत मुक्त व्यापार कराराच्या माध्यमातून दोन्ही देशांत विविध क्षेत्रातल्या सहयोगाच्या संधी उपलब्ध झाल्याचा उल्लेख मोदी यांनी केला. खनिज क्षेत्रातील सहयोगासाठी नवीन उद्योग संघ, ब्रिटनमधील नऊ विद्यापीठांची भारतात कॅम्पस, संरक्षण क्षेत्रात संयुक्त उत्पादन, सैन्य प्रशिक्षण सहकार्य करार अश्या विविध माध्यमातून दोन्ही देशातील दृढ संबंध अधोरेखित होत असल्याचं मोदी यांनी नमूद केलं. भारत आणि ब्रिटन यांच्यातील मानवी बंध हेच या नात्याचे खरे वैशिष्ट्य आहे असं स्टार्मर म्हणाले. 2028 पर्यंत जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचं उद्दिष्ट आणि 'विकसित भारत 2047' या

दृष्टिकोनाबद्दल मी मोदी यांचं अभिनंदन करतो. या प्रवासात आम्ही भारताचे भागीदार व्हावे, ही आमची इच्छा आहे, असंही स्टार्मर यांनी यावेळी सांगितलं.

**शिवराजसिंग चौहान**

प्रधानमंत्री धनधान्य योजना आणि डाळींच्या बाबतीतलं स्वावलंबन हे आत्मनिर्भर भारतासाठीच्या प्रयत्नातील एक महत्वाचं पाऊल असल्याचं केंद्रिय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या दोन्ही योजनांची सुरुवात नवी दिल्लीतून होणार आहे या पार्श्वभूमीवर त्यांनी काल दूरदर्शनशी संवाद साधला. प्रधानमंत्री धन-धान्य योजने अंतर्गत, कमी उत्पादकता असलेल्या 100 जिल्ह्यांमध्ये विविध उपाय योजनांच्या आधारे धान्य शेत माल उत्पादकता वाढीसाठी उपाययोजना केल्या जातील. अशा जिल्ह्यांची उत्पादकता राष्ट्रीय सरासरीपर्यंत वाढवल्यास एकंदर राष्ट्रीय उत्पादनाबरोबरच शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल. असंही चौहान यांनी सांगितलं.

**पंतप्रधान-गाझा करार**

गाझा शांतता कराराला मान्यता दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप आणि इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांचं अभिनंदन केलं आहे. ओलिसांची सुटका, इस्त्रायली सैन्याची माघार घेण्याचा आणि गाझाला मानवतावादी मदत साहित्याचा पुरवठा करण्याचा मार्ग मोकळा झाल्याबद्दल पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केलं. नेतान्याहू यांच्याशी काल झालेल्या दूरध्वनीवरील संभाषणा नंतर समाज माध्यमावरील संदेशात मोदींनी ही माहिती दिली. दहशतवादाविरुद्ध भारताची ठाम भूमिका यावेळी त्यांनी अधोरेखित केली.

7 ऑक्टोबर 2023 रोजी हमासने इस्त्रायली शहरांवर हल्ला केला होता त्यानंतर प्रत्युत्तरादाखल इस्त्रायलने गाझामध्ये हल्ले केले, ज्यामध्ये एकंदर बाराशे नागरिकांचा मृत्यू झाला आणि 251 लोकांना ओलीस ठेवले गेले. दरम्यान, हमास संघटनेच्या गाझा आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर 2023 पासून इस्त्रायली लष्करी कारवायांमध्ये 66 हाजारहून अधिक पॅलेस्टिनी मारले गेले आहेत. काल मुंबईत पंतप्रधान मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांच्यात झालेल्या चर्चेतही गाझातील परिस्थितीचा उल्लेख करत चर्चा झाली.

पंतप्रधान मोदी यांनी काल गाझा शांतता कराराबाबत अमेरिकेचे अध्यक्ष ट्रंप यांच्याशीही चर्चा केली. यावेळी दोन्ही नेत्यांनी भारत आणि अमेरिका यांच्यातील सध्या सुरू असलेल्या व्यापार वाटाघाटींमध्ये झालेल्या सकारात्मक प्रगतीचा आढावा घेतला. दोन्ही बाजू येत्या काही दिवसांत महत्वाच्या मुद्यांवर चर्चा करण्यासाठी सहमत असल्याचं मोदींनी म्हटलं आहे, दोनही देशांदरम्यान प्रमुख जागतिक आणि द्विपक्षीय मुद्द्यांवर सहकार्य अबाधित राहील असं संकेत असल्याचंही पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**बिहार-निवडणूक अधिसूचना**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची अधिसूचना आज जारी करण्यात येणार आहे. अधिसूचना जारी होताच, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया देखील सुरू होणार असून, उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख 17 ऑक्टोबर आहे. एकंदर 243 सदस्यीय विधानसभेसाठी दोन टप्प्यांत मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यात 121 जागांसाठी, 6 नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, 11 नोव्हेंबरला दुसऱ्या टप्प्यासाठी मतदान होईल. 14 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होईल. या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे; मात्र, अद्यापही विविध राजकीय पक्षांमधील जागावाटपाचा तिढा कायम आहे. मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी राजकीय पक्ष आश्वासनं देत आहेत. आपलं सरकार सत्तेत आल्यास, सरकारी कर्मचारी नसलेल्या प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी दिली जाईल असं आश्वासन राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी प्रसाद यांनी दिलं आहे, आणि, त्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर तरतुदी सुनिश्चित करण्यात येतील असं ते पुढे म्हणाले. तर, एनडीएच्या नेतृत्वाखालील सरकारमध्येच बिहारचा खऱ्या अर्थाने विकास होऊ शकतो हे राज्यातील जनतेला समजलं असल्याचा दावा भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी केला आहे.

**मतदार यादी**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपरिषदा तसंच नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रारूप मतदार यादी 8 ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आली आहे. या यादीतील नावे mahasecvoterlist.in या संकेतस्थळावर शोधण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तहसील, नगर परिषद आणि नगरपंचायतीच्या कार्यालयातही ही यादी उपलब्ध आहे. 1 जुलै 2025 रोजी विधानसभा मतदार यादीत नाव असलेल्यांचा समावेश या यादीत करण्यात आला आहे.

**तेलंगण**

तेलंगण राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद प्रादेशिक मतदार संघ निवडणुका स्थगित केल्या आहेत. उच्च न्यायालयाने मागासवर्गीयांना आरक्षण वाढवून 42 टक्के करण्याचा अंतरिम स्थगिती आदेश काल जारी केला. निवडणूक आयोगाने आवश्यक राजपत्र अधिसूचना मंजूर करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्थगित केल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या 23 तारखेपासून नियोजित होत्या आणि यासाठीची नामांकन प्रक्रिया काल पासून सुरू झाली होती. राज्य सरकारला प्रति- प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी चार आठवड्यांचा कालावधी देण्यात आला आहे

**मानसिक आरोग्य**

जागतिक मानसिक आरोग्य दिवसानिमित्त आज विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. 'आपत्कालीन परिस्थितीत सर्वांना मानसिक आरोग्याबाबत मदत मिळण्याची हमी' अशी यंदाच्या मानसिक आरोग्य दिनाची मुख्य संकल्पना आहे. आनंदी जीवनासाठी मानसिक स्वास्थ्य चांगलं राखणं आवश्यक आहे. गरज भासल्यास तज्ज्ञांची मदत घेण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

**पुरुष क्रिकेट**

भारत आणि वेस्ट इंडिज पुरुष क्रिकेट संघांदरम्यानचा दुसरा आणि मालिकेतील अंतिम सामना आजपासून नवी दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर सुरू होणार आहे. शुभमन गिल  भारतीय संघाचं नेतृत्व करत आहे. या आधीचा सामना भारताने जिंकला असून हा सामना जिंकून मालिका जिंकण्याचा भारतीय संघाचा  प्रयत्न असेल. फटकावलेल्या 94 धावा विशेष लक्षवेधीठरल्या.

**हवामान**

आसाम, नागालँड, मणिपूर, मेघालय, मिझोराम आणि त्रिपुरा, आंध्रप्रदेश, कर्नाटकचा किनारी भाग, केरळ, माहे, ओडिशा, कर्नाटक, तामिळनाडू, पुडुचेरी आणि कराईकल इथं मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. वायव्य अरबी समुद्र, मन्नारचे आखात आणि लगतच्या कोमोरिन भागात 35-45 किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार